# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/११/२०२५ (गुरूवार )**

---

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद आरोपी अटक, पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक १९/११/२०२५ रोजी पारशिवणी पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, मौजा खारी, पारशिवनी येथे राहणारा इसम नामे राहुल अशोक काळमेघ याचे जवळ तलवार आहे. मिळालेल्या माहीतीन्वये पोलीसांनी पंचासह मौजा खारी पारशिवनी येथे नमुद आरोपीच्या घरी जावुन राहुल अशोक काळमेघ, वय २६ वर्षे, रा.प्रभाग क्र. १२ खारी, पारशिवनी याला विचारपुस करून पंचासमक्ष त्याचे घराची घरझडती घेतली असता एक लोखंडी धारदार तलवार मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष तलवार जप्त केली आहे.

नमुद आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन पारशिवणी येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. **नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत काढला रूट मार्च आणि राबविल्या दंगा काबु योजना

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता आज दिनांक २०/११/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान

विभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांचे उपस्थितीत पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन कन्हान येथून सुरू करून आंबेडकर चौक, पिपरी, धरम नगर, दुर्गा चौक, तारसा चौक, धन्यवाद गेट, कांद्री चौक पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. तसेच हनुमान मंदिर, गांधी चौक येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला. सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत कन्हान पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारसह पोलीस मुख्यालय, दंगा नियत्रंण पथक असे उपस्थित होते.




आधार कार्ड
पॅन कार्ड
झेरॉक्स


POLIC



## पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील मौजा गरडेपार पारधीबेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/११/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा गरडेपार पारधीबेडा येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन धाड टाकुन आरोपी नामे **राजन सुरेश भोसले,वय ५० वर्ष,रा. गरडेपार ता. भिवापुर** याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १) २०० लीटर मोहाफुल दारू कीमंती २०,०००/— रूपये २) ४८०० किलो मोहाफुल रसायन सडवा किंमती १,६८,०००/— रूपये ३) २४ प्लॉस्टीक ड्रम किंमती २४,०००/— रूपये आणि हातभट्टीचे इतर साहीत्य असा **एकुण** किमंती २,१३,१००/— रूपयांचा मुद्देमाल मळुन आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री सेंवन तसेच वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद. ४ लाख ८७ हजरांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १९/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहफुल सडवा ,वाहन तसेच ईतर साहीत्य असा एकुण ४,८७,६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे २ गुन्हे नोंद आहे. वेलतुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १८ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११,२५० मिली देशी दारू, ६५० लीटर मोहाफुल दारू, ९,८६० लिटर सडवा, मोटर सायकल तसेच इतर साहीत्य असा एकुण ४,८७,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने